खे.ता.शि.प्र.मंडळाचे,

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर

## इतिहास विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८-१९

साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाची स्थापना १५ जून २०१८ रोजी करण्यात आली. महाविद्यालयात कला शाखा अंतर्गत इतिहास विभाग याचवेळी सुरू करण्यात आला. नव्याने सुरू झालेल्या महाविद्यालयात स्पर्धा परीक्षांमध्ये इतिहास विषयाचे असणारे महत्त्व तसेच इतिहास विषयाच्या विभिन्न संधी यामुळे कला शाखे साठी प्रथम वर्ष अंतर्गत या विषयाचा समावेश करण्यात आला. तसेच द्वितीय आणि तृतीय वर्षासाठी इतिहास हा एक विशेष स्तरीय विषय म्हणून निवडण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये इतिहास विभागात प्रथम वर्ष कला या वर्गात एकूण ७३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

कला शाखेतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या विविध संधी सोबत त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी इतर नाविन्यपूर्ण उपक्रम देखील घेण्यात आले. तसेच

९ऑगस्ट रोजी ऑगस्ट क्रांती दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.महान क्रांतिकारक हुतात्मा राजगुरू यांच्या जयंती निमित्ताने महाविद्यालयात वकृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय संविधानातील जनजागृती करण्यासाठी संविधान गौरव दिन महाविद्यालयात साजरा करण्यात आला.

अशा रीतीने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.